**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ०२ श्री. श्रीकांत लक्ष्मण सावंत यांचा उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर. एस. गव्हाणकर यांचेकडून शपथेवर सुरु</u>** –

१३) रामकृष्ण हे तळेखोल गावचे असुन आमचे शेजारी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचा पायलटींगचा व्यवसाय होता व मी त्यांचा कायमचा गिऱ्हाईक होतो.

१४) मी दोन प्रकरणांमध्ये दोन सह्या केलेल्या आहेत. करारावर साक्षीदार म्हणुन मी सह्या केलेल्या आहेत. हे मला माहित नाही की, माझ्या शपथपत्रामध्ये करार केलेल्या ठिकाणचे नाव नमुद नाही. माझ्या पुराव्याचे शपथपत्र कोणी तयार केले ते माझ्या लक्षात येत नाही. दोन्ही कराराच्या तारखा मला माहिती नाही. जमीनींचे सर्व्हे वर्णन माझ्या लक्षात येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.०१.०४.२०१८ व दि.०७.०२.२०१३ रोजी माझ्या सरतपासामध्ये नमुद केल्याप्रमाणे करारपत्र झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर मी, दळवींनी व इतर साक्षीदारांनी सह्या केल्याचे मी खोटे सांगत आहे. स.क्र.२६६ हि.क्र.१ या मिळकतीचे एकुण क्षेत्र मला माहिती नाही. त्या करारपत्रामध्ये विक्रीत करण्याचे तथाकथीत पाच गुंठयांचा नकाशा जोडला होता किंवा कसे ते माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, एक लाख रुपये मोबदला ठरला होता व त्यातील पंचवीस हजार रुपये माझ्या समक्ष परशुराम दळवी याला दिले, हे मी खोटे सांगत आहे. सिद्धार्थ बाबली बांदेकर यांना मी ओळखतो. या

न्यायालयामध्ये त्यांच्या विरुद्ध बोगस दस्तऐवज तयार केल्या प्रकरणी फौजदारी प्रकरण चालले होते, याची मला माहिती नाही.

१५) संमतीपत्र परशुराम दळवी व रामकृष्ण दळवी यांच्यात झाले होते. परंतु, त्याची तारीख मला माहिती नाही. दोन मिळकती संदर्भात ते संमतीपत्र होते. परंतु, त्या दोन्ही मिळकतींचे सर्व्हे वर्णन मला सांगता येणार नाही. संमतीपत्र किती क्षेत्राबाबत झाले होते, ते मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या संमतीपत्रावर परशुराम दळवी याची सही व अंगठयाचा ठसा असल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर रामकृष्ण दळवी यांनी सही करुन अंगठयाचा ठसा लावला व मी साक्षीदार म्हणुन सही केली, हे मी खोटे सांगत आहे. मिळकतींची मोजणी केव्हा केली होती व कोणी केली होती, हे माझ्या लक्षात नाही. पहिले पंचवीस हजार दिले होते व नंतर पंचाहत्तर हजार दिले होते. परंतु, त्याची तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम रु. पंचाहत्तर हजार मिळाल्याबाबत परशुराम दळवींनी रेव्हेन्यु स्टॅम्पवर सही करुन दिल्याचे व त्यास मी साक्षीदार असल्याचे मी खोटे सांगत आहे. मला त्या पोच पावतीची तारीख माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, रेव्हेन्यु स्टॅम्पवर परशुराम दळवी, नकुल दळवी, सिद्धार्थ बांदेकर व मी सह्या केल्याचे खोटे सांगत आहे. १०० चौ.मी. जमीन आपण तुम्हाला देतो असे परशुरामने सांगितले होते. परंतु, ते केव्हा सांगितले होते, ती तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, परशुराम दळवींनी आपण

तुम्हाला १०० चौ. मी. जमीन देतो असे रामकृष्ण दळवींना सांगितले नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, पैसे कुठल्या ठिकाणी देण्यात आले, त्याचा उल्लेख माझ्या शपथपत्रामध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व रामकृष्ण दळवींनी सर्व खोटे कागदपत्र तयार केलेले आहेत, खोटया पावत्या तयार केलेल्या आहेत व आम्ही खोट्या सह्या केलेल्या आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, किती रुपयांच्या नोटांमध्ये पैसे दिले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, परशुराम दळवीला लुबाडण्याकरीता मी रामकृष्ण दळवी व आता त्यांचा मुलगा असे आम्ही संगनमत करुन खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे. रामकृष्ण दळवी जीवंत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते मी खोटे सांगत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/–

ठिकाणः– दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)
दिनांकः– २१/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) दोडामार्ग.